कलम ४ ( 1 ) ( ख ) ( iii )

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरयित्व निश्चित करुन कार्यपध्दतीबाबत तपशिल खालील प्रमाणे

कै.ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालयतील प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती लिपीकामार्फत तपासुन मा . आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सादर केले जातात . कै.ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालय व त्यांच्या अंतर्गत ४ दवाखाने मार्फत कार्यक्षेत्रात येणा-या नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरविणे , राष्ट्रीय आरोग्य कार्यकमांची अंमलबजावणीसाठी रुग्णालय व दवाखान्यामधील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्या अंतर्गत असणा-या कर्मचा-यांकडुन कामकाज केले जाते . रुग्णालयात तातडीक व प्रसुती विभागात केसपेपर काढुन तातडीक विभाग येथे वैद्यकीय अधिकारी कडुन रुग्ण तपासले जाते व गरजेनुसार उपचार / दाखल / संदर्भिय केले जातात . रुग्णालयाच्या ओ.पी.डी विभागा मध्ये आलेले रुग्ण ओ.पी.डी वेळेनुसार केसपेपर घेऊन गरजेनुसार संबंधीत विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन तपासणी करुन कै.ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालयाच्या आय.पी.डी विभागामध्ये २४ तास रुग्णांचे गरजेनुसार उपचार दिले जातात . रुग्णालय व दवाखाने स्तरावरील कोणतीही अडचण आल्यास प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती मुख्य कार्यालयाकडे सादर केली जाते . धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ धन्वंतरी स्वास्थ योजना विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा आस्थपनेवरील कायम स्वरुपी कार्यरत असणारया कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबीयांना ( पती , पत्नी २ आपत्य २५ वर्षा पर्यत ) वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात . तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो .